
'B'
Accredited by NAAC
(2009)

# Shivaji University, Kolhapur

## Centre of Nehru Studies



# Certificate

This is to certify that Shri/~~Smt~~. Vishwanath M. Awad.

has participated in the National Seminar **on "India's Foreign Policy : Continuity and Change"**

held on 4th & 5th March, 2011 at the Centre of Nehru Studies, Shivaji University, Kolhapur.

He/She has presented a paper entitled "NAM - Development & relevance" at the seminar.

Rasam

**Dr. Vasanti Rasam**
Co-ordinator
Centre of Nehru Studies,
Shivaji University, Kolhapur

## अलिप्ततावाद चळवळ विकास व प्रस्तुतता

**प्रस्तावना :**

संविधान सभेच्या १३ डिसें १९४६ ला झालेल्या बैठकीत देशाची ध्येय धोरणे व उददीष्टे याबाबत प्रस्ताव मांडला त्यामध्ये असे म्हटले गेले की ही प्राचीन भुमी विश्वात आपले योग्य सन्माननीय स्थान प्राप्त करेल तसेच विश्वातल्या शांतीच्या स्थापनेसाठी व अखील मानव जातीच्या कल्याणासाठी आपले ऐच्छिक आणि अर्थपूर्ण योगदान देईल. त्याचप्रमाणे संविधानाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये कलम ५१ क, ख, ग, घ यामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेला प्राधान्य देण्याच्या दृष्टीकोणातून राज्य प्रयत्न करेल असे म्हटलेले आहे. अलिप्तता हा शब्दप्रयोग नेहरू नी सर्वप्रथम कोलंबो मध्ये केला . आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरुपाच्या गटातटाच्या राजकारणात अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद विधायक क्रियाशिल व निश्चित स्वरुपाचा नितीप्रवाह म्हणून या धोरणास महत्व आहे.

**अर्थ :** अलिप्ततावाद याला असंलग्नता, गटनिरपेक्षता, असेही शब्द वापरले जातात कोणत्याही सत्तागटामध्ये सामिल न होता अलिप्त राहणे.

**व्याख्या :**

- युनूच्या मते : अलिप्ततावाद म्हणजे शितयुदधातील तटस्थता.
- पिटर लायनच्या मते : राजनयीक किंवा राजकीय तटस्थता म्हणजे दोन गटामध्ये जेव्हा भांडण असते. तेव्हा तिसरा गट त्यांच्यापैकी कुणाचीही बाजू न घेण्याचे धोरण ठरवित असतो.
- श्वातर्सवर्जर च्या मते : संधिपासून अलिप्त राहण्याचे धोरण.

पहिल्या व द्वितीय महायुध्द काळातले शीतयुध्द, सत्तासंतुलन, लष्करी करार, संघटना या विविध सिध्दांन्ताच्या पार्श्वभुमीवर अलिप्ततावादी चळवळ उदयाला आली. १९४५ साली अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांनी साम्यवादाला शह देण्यासाठी नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना अमिषे दाखवून आपल्या लष्करी गटात सामील करण्याचा प्रयत्न केला तेव्हा नेहरूनी कोणत्याही सत्तागटात सामील न होण्याचे ठरविले . ७ सप्टेंबर १९४६ रोजी रेडिओवरून केलेल्या भाषणात जागतिक गटबाजी व सत्तास्पर्धापासून भारत दूर राहिल हे स्पष्ट केले.

अलिप्ततावादी चळवळीची दोन मुलतत्वे आहेत १.लष्करी गटांना विरोध २.स्वतंत्र धोरण त्याचप्रमाणे ही संघटना उदयाला येण्यापाठी मागे काही महत्त्वाची कारणेही आहेत.

१.नव्याने स्वातंत्र झालेल्या देशामधील राष्ट्रवाद
२.वसाहतवादाला विरोध
३.विकासाचा आणि आर्थिक
४.सांस्कृतिक व वांशिक वंध
५.पाश्चात्य देशापासून अलग असणारी संस्कृती
६.विकासासाठी शांततेची गरज

**अलिप्ततावादी चळवळीचा विकास :**

अलिप्ततावादी चळवळीची सुरुवात प्रामुख्याने १९५५ साली बांडुग मध्ये भरलेल्या आफ्रीकन व आशियायी देशाच्या शिखर संमेलनापासून झाली यामध्ये अलिप्ततेचा अर्थ आणि तात्कालीक परिस्थतीत निर्माण झालेल्या संकटावर मात करण्यासंबधी घोषणा करण्यात आल्या त्यामुळे नवनवीन देश या सिध्दान्ताकडे आकर्षित झाले.

१. बेलग्रेड शिखर-परिष्द १९६१ : २६ सदस्य आणि ३ निरिक्षक या परिषदेस उपस्थित होते : सत्ताविस मुददयांचा जाहिरनामा घोषित करण्यात आला. वसाहतवाद व वंशवादाला विरोध करण्याबरोबरच पारतंत्र्यात असलेल्या देशांना स्वातंत्र देण्याची मागणी करणेत आली ( अंगोला, ट्युनिशिया , अल्जीरीया ) सदस्य देशांची आर्थिक स्थिती सुधारणेचा प्रयत्न करणे आणि शितयुध्द बंद करण्यासाठी प्रयत्न करणे.

२.कैरो परिषद १९६४ : ४७ सदस्य आणि ११ निरिक्षक देशांचा सहभाग शांतता व आंतरराष्ट्रीय सहकार्याची योजना या नावाने जाहिरनामा. अण्वस्त्रनिर्मीती रोखण्यासाठी अवाहन, भुमीगत अणुस्फोटावर बंदीची मागणी, निशस्त्रीकरणाचे अवाहन.

३. लुसाका परिषद १९७७ : ५४ सदस्य ८ निरीक्षक राष्ट्रांचा सहभाग .पोर्तुगाल व वंशभेदी द.आफ्रिका या देशावरोवरचे राजकिय व आर्थिक संवध तोडण्याचा ठराव अलिप्ततावाद व आर्थिक प्रगतीचा ठराव इस्त्राइल ने अरव देशांच्या भुमीतून माघार घ्यावी व नववसाहतवादावर टिका करण्यात आली.

४.जार्जटाऊन परिषद १९७२ : ५८ देशांचा सहभाग हिंदी महासागरास शांतता क्षेत्र अमेरिकेने व्हिएतनाम मधून माघार घ्यावी या बाबतचा ठराव

५.अल्जियर्स परिषद १९७३ : ७६ देश ९ निरिक्षक विविध प्रकारचे राजकीय व सामाजीक ठराव मंजूर केले. इस्त्राइल ने अरव देशांच्या भुमीतून माघार घ्यावी या ठरावाचा पुन्नरूच्चार

६.कोलंबो परिषद १९७५ : ८६ राष्ट्रप्रमुखांची उपस्थती संघटनेतील देशांच्या परस्पर संघर्षावावात चर्चा

७.हवाना परिषद १९७५ : मार्च १९७५ मध्ये हवाना येथे १७ राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांची परिषद भरली हिंदी महासागरातील अमेरिकेचा हस्तक्षेप यावर टिका करण्यात आली.

८.लीमा संमेलन : द.अमेरिकेतील पेरू देशाची राजधानी लीमा याठिकाणी ८२ देशांनी सहभाग घेतला सदस्य देशांसाठै आर्थिक कोष तयार करणेत आला प्रत्येक राष्टांने ५000000 डॉलर्स समान वर्गणी घेण्याचे ठरले.

९.दिल्ली परिषद १९७७ : एप्रील १९७७ मध्ये दिल्ली मध्ये अलिप्त देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची शिखर परिषद वाजपेयी यांचे अध्यक्षतेखाली भरली.

१०.हवाना परिषद मे १९७८ : ९४ सदस्य राष्ट्र उपस्थित सदस्य देशातील मतभेद क्युबा व्हिएतनाम रशियाशी तर सिंगापूर व झायरे अमेरिकेशी जवळीक फिडेल कास्टोच्या भुमिकेवर आक्षेप इजिप्तच्या हाकालपट्टीची मागणी संरक्षणाच्या प्रश्नावर चर्चा.

११.दिल्ली परिषद १९८३ : ९९ सदस्य देश १0 निरिक्षक १९ पाहुणे उपस्थित अणुचाचण्यावर बंदीची मागणी दिएगोगार्सी या बेट मॉरिशसला देण्याची मागणी पॅलेस्टाईनला पाठिंबा.

१२.हरारे परिषद १९८६ : १0१ देश नामिबियाच्या स्वातंत्र्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या खास बैठकिची मागणी आफ्रीका निधीची स्थापाना इराण इराक युध्द थांबविण्याची मागणी

१३.बेलग्रेड परिषद १९८९ : निसर्ग रक्षणासाठी राजीव गांधीची चळवळ उभी करण्याची मागणी विकसीत देशांशी संवाद सुकर होण्यासाठी पंधराच्या गटाची स्थापना .

१४.१९९२ बेलग्रेड परिषद :

१५.१९९५ कोलंबिया परिषद :

१६.१९९८ डर्बन परिषद :

१७.२00३ क्वालांलापूर परिषद :

१८.२00६ हवाना परिषद :

१९.२00९ शर्म अल शेख : ११८ सदस्य व १७ निरिक्षक देश उपस्थित

भारत हा अलिप्ततावादी चळवळीचा जनक राहिलेला आहे वसाहतवाद , लष्करी मदत , सैनिकी गट , शीतयुध्द या पार्श्वभुमीवर अलिप्ततावादाची उभारणी भारताने केली आफ्रीका , आशिया , लॅटीन अमेरिका इत्यादी देशामध्ये वसाहतवाद कमी करण्यासाठी भारताने प्रयत्न केले नव्या जगाची निर्मीती करण्याचा प्रयत्न केला जगातील बड्या देशांचे महत्व कमी करण्यासाठी व आर्थिक स्थिरता येण्यासाठी अलिप्ततावादी चळवळ अतिशय उपयुक्त ठरली.

**अलिप्ततावादी चळवळ प्रस्तुतता :**

शितयुध्द संपले आसले तरी आणि सत्तास्पर्धा संपली असली तरी मानव जातीची प्रगती आणि नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांचे प्रश्न सोडविण्यासाठी व जागतिक प्रश्न सकारात्मक मार्गाने सोडविण्यासाठी उदयाला आलेल्या या संघटना आजही तेवढीच उपयुक्तता आहे परिस्थिती बदलली असली तरी आणि आज क्षेत्रीय साम्राज्यवाद नसला तरी आर्थिक साम्राज्यावादाला तोंड देण्यासाठी या संघटनेची आवश्यकता आहे. अलिप्ततावाद हे काळाचे अपत्य असले तरी नैतिक मुल्यांसाठी आजही उपयुक्त आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण दिवसागणिक वदलत आहे आशिया खंडातल्या देशामध्ये महासत्तेची शिखर स्पर्धा आणि त्यातुन सत्तासंघर्ष उघड आहे. अलिप्ततावादाने भारतीय लोकशाहीला मोठ्या प्रमाणात स्थैर्य दिले आहे अलिप्ततावादामुळे आम्हाला सुरक्षा परिषदेत स्थान मिळू शकलेले नसले तरी भारताचे आशिया खंडातील महत्व मात्र अधोरेखीत झाले आणि या संघटनेमुळे जगाचे नेतृत्व करायची संधी मिळाली आहे.

जगाचे राजकारण ७० च्या दशकातले राहिले नसले तरी अमेरिका , फ्रान्स यासारखे देश आर्थिक दुरावस्थेत असताना जागतीक महत्वाच्या भुमिका बजावण्याची संधी भारताला अलिप्ततावादामुळे मिळाली आहे नेहरू , नासेर , टिटो यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या ही चळवळीने कोणाच्याही टाचेखाली न राहता स्वतःची भुमिका जोरदार मांडली. आज युनोपासून ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीपर्यत अमेरिकेची दादागिरी सुरू आहे. शेतीमालाच्या सबसिडी अमेरिका व युरोपीय देश कमी करण्यास तयार नाहीत पण भारताला स्पर्धेला तयार राहायला सांगत आहेत. जागतिक व्यापार संघटना असताना इतर संघटना कशाला हा प्रश्न पडीत असला तरी नेफ्ता जी ७ युरोपीय समुदाय या सारख्या संघटना गुंडाळलेल्या नाहीत जागतिकीकरणामुळे विकसीत व अविकसीत देश यांच्यातली दरी रूंदावत चाललेली आहे त्यामुळे नाम सारख्या संघटनांच्या माध्यमातुन आशा समस्यांना वाचा फोडता येईल. अमेरिकेच्या दहशतवादास उत्तर देण्यासाठी नाम ची नितांत आवश्यकता आहे. आज जगाच्या पाठीवर एकही देश पारतंत्र्यात नसला तरी आर्थिक पारतंत्राचा मोठा धोका निर्माण झालेला आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या व आंतरराष्ट्रीय संघटनेच्या सैनिकी कारवाईवर नियंत्रण ठेवणेसाठी व दुर्बल देशांवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी व सार्वभौमत्व टिकवून ठेवण्यासाठी अलिप्ततावादाची नितांत आवश्यकता आहे

**संदर्भ :**

१. आंतरराष्ट्रीय संबंध : वा. भा. पाटील
२. १९४५ से अबतक आंतरराष्ट्रीय संबंध : के. के. कुलश्रेष्ठ
३. भारताचे परराष्ट्रीय धोरण : डॉ सुनिल दाते
४. कुमार केतकरांचा लेख : लोकसत्ता
५. आंतरराष्ट्रीय संबंध : र. घ. वराडकर
६. लोकसत्ता वर्तमानपत्र

प्रा विश्वनाथ महादेव आवड
शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज
ता. माळशिरस जि. सोलापूर
मो. ९४२२०२८८३८